**रायगड जिल्हा परिषद,अलिबाग**
**(सामान्य प्रशासन विभाग)**
**कुंटेबाग, रायगड जिल्हा परिषद प्रशासकिय इमारत, अलिबाग,जि.रायगड पिनकोड-४०२२०१**
Email-bdoraigad@gmail.com दुरध्वनी क्र.०२१४१-२२२०८२

---

जाहिरात क्र.- ०२ /२०२५

जिल्हा परिषद रायगड अंतर्गत शासनाच्या योजना तसेच जिल्हा परिषद मार्फत असलेल्या योजना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी त्या योजनांच्या अनुषगांने करण्यात येणा-या कामांना प्रसिध्दी देण्यासाठी तसेच जनता व जिल्हा परिषद यांच्यात समन्वय साधण्यासाठी तसेच सोशल मिडीया जि.प कामांची प्रसिध्दी करणेसाठी कंत्राटी ११ महिन्यांसाठी मानधनी तत्वावर जनसंपर्क अधिकारी पदासाठी पात्र उमेदवारांकडून खालील नमुद अटी व शर्तींच्या अधीन राहुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| **अर्ज सादर करण्याचे ठिकाण** | **सामान्य प्रशासन विभाग, रायगड जिल्हा परिषद, कुंटेबाग, प्रशासकिय इमारत,अलिबाग, जि. रायगड, पिनकोड- ४०२२०१**<br>**Email-bdoraigad@gmail.com दुरध्वनी क्र.०२१४१-२२२०८२** |
| **अर्ज सादर करण्याचा कालावधी** | **दिनांक - ३०/०९/२०२५ ते १३/१०/२०२५ सार्वजनिक सुट्टी सोडुन कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत. (दि. १३/१०/२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत ) प्रत्यक्ष अथवा पोष्टाने अर्ज पोहच करावेत** |

सदर पदासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणीक अर्हता व शर्ती अटीं खालील प्रमाणे :-

१ **शैक्षणीक अर्हता**

(अ) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.

(ब) मान्यता प्राप्त विद्यापीठाचा वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रम ५०टक्के पेक्षा अधिक टक्केवारीसह उत्तीर्ण होऊन पुर्ण केलेला असावा.

२ **अनुभव**

(अ) उमेदवाराने जिल्हांस्तरावरील "अ" व "ब" दर्जाच्या वृत्तपत्रामध्ये पाच वर्ष काम केल्याचा अनुभव असावा. यामध्ये किमान तीन वर्ष अर्जदाराने "अ"दर्जाच्या वृत्तपत्रात काम केलेले असावे.

(ब) कोणत्याही संस्थेकडुन सामजिक कार्याकर्ता प्रशिक्षण घेऊन सामाजिक कार्यकर्ता म्हणुन समाजसेवेचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

३ जिल्हा परिषदेने ठरवून दिलेल्या मासिक मेहनताना रक्कम रू. २००००/-(अक्षरी र.रू. वीस हजार मात्र) प्रमाणे काम करणे अर्जदारास बंधनकारक राहिल.

४ नियुक्त अर्जदारास अदा केली जाणारी मासिक मेहनताना रक्कम ही कंत्राटी ११ महिन्यांसाठी स्वरूपाची असल्याने नियुक्त अर्जदाररास नियमित जिल्हा परिषद कर्मचारी संबोधले जाणार नाही. सबब त्याला कोणत्याही प्रकारे आणि कोणत्याही वेळेस शासकीय सेवेत कायम करण्याबाबत दावा करता येणार नाही. तसेच कोणत्याही क्षणी त्याची नियुक्ती संपुष्टात आणण्याचा किंवा मुदतवाढ देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.

५ अर्जदाराने अर्ज करण्याच्या सर्वसाधारण कार्यपध्दतीव्दारे विहीत मुदतीत अर्ज सादर करावा.तसेच अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती जोडाव्यात.विहीत मुदतीत प्राप्त आणि शैक्षणिक अर्हता प्राप्त अशा पात्र अर्जदारांच्या अर्जांचाच विचार मुलखतीसाठी ग्राहय धरला जाईल

६. मुलाखतीच्या दिनांक,वेळ आणि ठिकाण याबाबतचा तपशिल अर्जदारांस पत्राने कळविला जाईल.

७ अपवादात्मक परिस्थीतीमध्ये सदरची जाहिरात कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी राजिप अलिबाग यांच्याकडे राखुन ठेवण्यात आला आहे.

नेहा भोसले (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा परिषद,अलिबाग